सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई अंतर्गत बुलडाणा जिल्हयातील नांदुरा तालुक्यातील कंडारी धरणामध्ये असलेल्या १० गावांच्या नळ योजनांच्या विहिरीपर्यंत मौजे शेंबा बु येथील जलशुध्दीकरण केंद्रावरुन तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९ /प्र.क्र. ७१ /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ मे, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६

३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक जा.क्र. उपआ/विकास/ पाणी टंचाई /अका/ कावि /७०६/१९, दिनांक १५.०५.२०१९ पत्र.

४) शासन पत्र क्रमांक स्थासबै-२०१८/प्र.क्र. २०१ /पापु १४, दिनांक २२.०५.२०१९ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई कालावधीसाठी नांदुरा तालुक्यातील कंडारी धरणामध्ये असलेल्या १० गावांच्या नळ योजनांच्या विहिरीपर्यंत मौजे शेंबा बु येथील जलशुध्दीकरण केंद्रावरुन तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या

अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक २१.०५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक २१.०५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, अमरावती नांदुरा तालुक्यातील कंडारी धरणामध्ये असलेल्या १० गावांच्या नळ योजनांच्या विहिरीपर्यंत मौजे शेंबा बु येथील जलशुध्दीकरण केंद्रावरुन तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेचा प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ च्या पत्रासोबत शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावीत तात्पुरती पुरक नळ पाणी पुरवठा योजनेच्या रुपये १३८.२८ लाख (अक्षरी रुपये एक कोटी अडतीस लाख अठ्ठावीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक २१ मे, २०१९ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने या आदेशान्वये या तात्पुरत्या पुरक नळ पाणी पुरवठा योजनेच्या उपांगाच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

उपांग निहाय मंजूर करण्यात आलेल्या तरतुदींचा तपशिल.

Sr. No.	Particulars	Amount	
1	Pure Water Pumping Machinery 10 HP & 51 M Head	Rs.	148650.00
2	Pure Water Rising Main 140 MM PVC 6KG and 9830 M long	Rs.	11730350.00
3	Flow Control Valves	Rs.	327425.00
4	Trail Run for Three Months with Pure Water Charges	Rs.	140183.00
	Total	**Rs.**	**12346608.00**
	Add 12 % for GST on Total Cost Rs. 12346608.00 x 12 %	Rs.	1481592.00
	Total	Rs.	13828200.00
	Say	**Rs.**	**13828000.00**

१) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी कंडारी धरणामध्ये उद्भव असलेल्या संबंधित १० गावांच्या नळ योजनांच्या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली पूरक पाणी पुरवठा योजना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) मौजे शेंबा बु. ग्रामपंचायतीकडून त्यांच्या जलशुध्दीकरण केंद्रामधून पाणी उचलण्याबाबत ना-हरकत ठराव घेणे आवश्यक आहे.

४) मौजे शेंबा ग्रामपंचायतीच्या WTP मधून प्रस्तावित १० गावांना पाणी देण्यासाठी तसेच उर्ध्ववाहिनी व पंप इत्यादी उपागांची क्षमता तपासणी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी करण्यात यावी.

५) प्रस्तुत १० गावाची योजना टंचाई कालावधीत व तद्नंतर चालविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेने घेणे आवश्यक आहे. त्याबाबत जिल्हा परिषदेचा ठराव घेण्यात यावा.

६) योजनेत समाविष्ट गावांच्या ग्रामपंचायतीकडून योजना चालविण्यासाठी होणारा अतिरिक्त

खर्च वसुल होण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी आकारणी करण्यात येईल याकरिता संबंधित ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त करण्यात यावा.

७) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत.

८) योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

९) निविदा प्रक्रीया दिनांक ०६ जून, २०१९ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.

१०) निविदा प्रक्रीया दिनांक ०६ जूनपर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

११) शेंबा ग्रामपंचायतीकडून त्यांचा जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी उचलण्यासाठी ना-हरकत ठराव, शेंबा ग्रामपंचायतीच्या योजनेची सदर १० गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी क्षमता तपासणी करण्यात यावी. तसेच योजना चालविण्यास तयार असल्याबाबतचा प्रत्येक ग्रामपंचायतीचा तसेच जिल्हा परिषदेचा ठराव प्राप्त करुन घेण्यात यावा. या सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर योजनचे कार्यारंभ आदेश देण्यासाठी शासनाची सहमती घेण्यात यावी.

१२) योजनेची कामे दिनांक ३० जून, २०१९ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

१३) सदर योजनेची प्रस्तावात नमूद केलेली कामे जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्या मार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती व योजनेचे व्यवस्थापन संबंधित जिल्हा परिषदेमार्फत करणे आवश्यक राहील.

१४) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देताच योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. तद्नंतर ३० % निधी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर योजनेची प्रगती विचारात घेऊन वितरीत करावा. उर्वरित २०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

१५) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

०३. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

०४. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक २१ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२२१७३६२४२२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ganesh Nivrutti Pawar

Digitally signed by Ganesh Nivrutti Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=805bdef8ce1424c02121cece0d20e917ffa1ef512d7e8fa2e49d93adbb5ad352, cn=Ganesh Nivrutti Pawar
Date: 2019.05.27 19:03:43 +05'30'

(गणेश पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२) महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८) विभागीय आयुक्त, अमरावती
९) जिल्हाधिकारी, बुलडाणा
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा

११) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती.
१२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा
१३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बुलडाणा
१४) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१५) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१६) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७) उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१८) पापु १४ (निवडनस्ती)